सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, ०६ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २८३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सुरेश धस यांच्या अजित पवारांवरील टीकेमुळे राष्ट्रवादीचा संताप!

## बेभान सुटलेला बैल मोकाट सोडणार का?, मिटकरींचा मुख्यमंत्र्यांना सवाल

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई,दि.५ जानेवारी : बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मागणीने जोर धरला असताना भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर केलेल्या टीकेमुळे महायुती मिठाचा खडा पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

धस यांच्या वक्तव्याचा निषेध करीत त्यांना समज देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस कडून ज्या नेत्याकडून करण्यात येत आहे पक्षाचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी याबाबत सुटलेल्या बैलाला कधीपर्यंत मोकाट सोडणार ?असा सवाल थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केला आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ राज्यभरात आक्रोश मोर्चा काढण्यात येत आहे.

वाल्मिक कराड याच्यावर क*** कारवाई आणि त्याचे गॉडफादर असलेल्या मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर राजीनामेची मागणी करत असतानाच परभणी येथे शनिवारी झालेल्या सभेत सुरेश धस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना उद्देशून 'क्या हुआ तेरा वादा अजित दादा?' अशी उपवासात्मक टीका केली होती तसेच आज पुण्यात झालेल्या मोर्चात ही त्यांनी अजित पवार यांनाही लक्ष्य केले.त्यामुळे राष्ट्रवादीचे नेते आक्रमक झाले आहेत. अमोल मिटकरी यांनी ट्विटरवर थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टॅग करीत

आपल्या पक्षाचे आमदार सुरेश धस यांनी काल परभणीत अजितदादाविषयी जी गरळ ओकली .त्याबद्दल आपण त्यांना जाब विचारणार की त्यांचा बेभान सुटलेला बैल आणखी मोकाट सोडणार? असे स्वीट केले आहे तर युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी धस यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे.

महायुतीमध्ये जर तणाव निर्माण झाल्यास त्याला सुरेश धस जबाबदार असतील असे वक्तव्य मिटकरी यांनी केले असून पक्षाच्या नेत्यांनी व मुख्यमंत्र्यांनी त्यांना आवर घालावा अशी विनंती केली आहे.

**सुरेश धस यांचे प्रत्यूत्तर**

परभणीतील सभेत केलेल्या वक्तव्याबाबत मिटकरी चव्हाण यांच्याकडून झालेल्या टीकेला भाजप आमदार सुरेश धस यांनी पुण्यात झालेल्या आक्रोश मोर्चाच्या सांगता सभेत प्रत्युत्तर दिले ,' मीही अजितदादांसमवेत अनेक वर्षे एकत्र काम केले आहे. तुम्ही अजून माझ्यासमोर बच्चे आहात. माझ्या नादाला लागू नका, असा इशारा दिला.

# चीनी व्हायरसच्या पार्श्वभूमीवर तेलंगणात गाईड लाईन्स जारी

हैदराबाद : चीनमध्ये ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) झपाट्याने पसरत आहे. त्यामुळे तो कोरोना प्रमाणे साथरोगाचे रूप घेऊ शकतो अशी भीती वाढली आहे. भारतातही यावर बारीक लक्ष ठेवले जात आहे. यापार्श्वभूमीवर तेलंगणा सरकारने मार्गदर्शक तत्त्वे (गाईड-लाईन्स) जारी केली आहेत. मात्र, राज्यात अद्याप एकही रुग्ण आढळलेला नाही.




तेलंगणा राज्याच्या आरोग्य मंत्रालयाने स्पष्ट केले की राज्य सरकार चीनमधून येत असलेल्या एचएमपीव्हीच्या बातम्यांवर लक्ष ठेवून आहे. तसेच केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या सहकार्याने परिस्थितीचे निरीक्षण करीत आहे. नागरिकांनी अफवांपासून दूर राहावे आणि खबरदारीचे पालन करावे, असे आवाहन राज्याच्या आरोग्य विभागाने केले आहे. तेलंगणा आरोग्य विभागाने राज्यात उपस्थित असलेल्या श्वसन संसर्गावरील डेटाचे विश्लेषण केले आणि असे आढळले की डिसेंबर २०२३ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत संसर्गाच्या प्रकरणांमध्ये लक्षणीय वाढ झालेली नाही. आरोग्य विभागाने श्वसनसंक्रमण रोखण्यासाठी नागरिकांना खालील खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे आणि मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

तेलंगणा सरकारने जारी केलेल्या गाईड लाईन्स प्रमाणे नागरिकांनी खोकताना किंवा शिंकताना आपले तोंड आणि नाक रुमालाने किंवा टिश्यूने झाकावे. आपले हात वारंवार साबणाने आणि पाण्याने धुवावे किंवा अल्कोहोल-आधारित सॅनिटायझर वापरावा. गर्दीची ठिकाणे टाळा आणि फ्लूने बाधित लोकांपासून अंतर राखा.ताप, खोकला किंवा शिंक येत असल्यास सार्वजनिक ठिकाणी जाणे टाळावे. पुरेसे पाणी प्यावे आणि पौष्टिक आहार घ्यावा. आजारी असताना घरी रहा आणि इतरांशी संपर्क मर्यादित करा. पुरेशी झोप घ्यावी आणि इतरांशी हस्तांदोलन टाळावे. टिश्यू पेपर किंवा रुमाल पुन्हा पुन्हा वापरू नये. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे टाळावे आणि डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेऊ नये असे या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केले आहे.

# गुणवत्तापूर्ण शिक्षण पद्धतीच्या यशस्वीतेसाठी सर्वच घटकांनी योगदान द्यावे : शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. ५ जानेवारी :- गुणवत्तापूर्ण आनंददायी शिक्षण पद्धतीत विद्यार्थी फक्त परीक्षांसाठी तयार न होता जीवनासाठी तयार होतात, आणि शिक्षण हा त्यांच्या आयुष्यातील आनंदाचा स्रोत बनतो. यामुळे शिक्षण क्षेत्रातील सर्वच घटकांनी आनंददायी शिक्षण पद्धतीच्या यशस्वीतेसाठी आपले योगदान द्यावे, असे आवाहन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी रविवारी केले.

'गुणवत्तापूर्ण आनंददायी शिक्षण पद्धती' या विषयावर जयहिंद महाविद्यालयात आयोजित चर्चसत्रात ते बोलत होते. यावेळी आमदार जयंत आजगावकर,प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी आणि राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व शिक्षकेतर संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मंत्री भुसे म्हणाले, शिक्षण विभागाचे आपण सर्वचजण एक घटक आहोत. भावी पिढी घडविण्यासाठी ज्ञानदानाचे जे पवित्र काम करत आहात ते अतुलनीय व भाग्याचे आहे. गुणवत्तापूर्ण आनंददायी शिक्षण पद्धती हा आव्हानात्मक विषय असला तरी आपल्या सर्वांच्या सहकार्यातून तो यशस्वीपणे राबविला जाईल याची खात्री आहे. विद्यार्थ्यांसाठी असे वेगवेगळे उपक्रम राबवून शिक्षण विभागाचा एक रोडमॅप आपण ठरवू. येणाऱ्या काळात शैक्षणिक धोरण राबविताना सर्वांना सोबत घेऊन आपण काम करूया, असे आवाहन त्यांनी केले.

# मंत्री मुंडेंच्या कार्यकर्त्यांकडून रोज ८०० धमकीचे कॉल : अंजली दमानिया यांचा आरोप

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई, दि.५ जानेवारी: संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यावर कठोर कारवाई करावी, यासाठी आग्रह धरत असल्याने आपल्याला दररोज गेल्या तीन दिवसापासून दररोज सातशे ते आठशे धमकीचे कॉल व अश्लील मेसेज येत आहेत .मंत्री धनंजय मुंडे व पंकजा मुंडे यांच्या कार्यकर्त्यांकडून हे करण्यात येत आहेत, असा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी रविवारी पत्रकार परिषदेत केला.

त्याबाबतचे व्हाट्सअप चॅट व कॉलच्या प्रिंट दाखवत त्यांनी त्याविरोधात आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पोलीस महासंचालकांनाकडे तक्रार करणार असल्याचेही सांगितले.

देशमुख यांच्या हत्येनंतर आरोपींना मिळत असलेला राजकीय आश्रय, पोलिसांची तपासातील शिथीलतेबाबत दमानिया यांनी बीडमधील अनेक धक्कादायक फोटो आणि व्हिडिओ शेअर केले . धनंजय मुंडे यांच्या मंत्रीपदाचा राजीनामा घेण्यासाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनही केले होते.

बीडमधील पोलिसांच्या उच्चपदस्थ ठिकाणी अधिकांश अधिकारी वंजारी समाजाचे आहेत. त्याची यादी काही दिवसांपूर्वी त्यांनी शेअर करीत तपासाची मागणी केली होती. यानंतर आपल्याला मुंडे यांच्या कार्यकर्त्यांकडून लक्ष्य केले जात असल्याचा आरोप करून त्या म्हणाल्या, धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्याकडून वंजारी समाजातील नागरिकांचा गैरवापर केला जात आहे.नरेंद्र सांगळे नावाच्या एका व्यक्तीने मोबाईल नंबर सोशल मीडियावर शेअर केला आणि त्यांना सतत फोन करण्याचे आवाहन दिले. त्यानंतर एका दिवसात ७०० ते ८०० फोन येत आहेत. सांगळे,सुनील फड, हे धनंजय मुंडेंचे कार्यकर्ते असून त्यांच्याकडून माझ्याविरोधात अत्यंत अश्लिल आणि अर्वाच्च भाषेचा वापर करण्यात आला आहे. मी मॉरीसिसमध्ये स्कोबाइन केले होते त्याचा फोटो शेअर्स करीत त्याबाबत खालच्या स्तरावर टिप्पणी करण्यात आली असल्याचे दमानिया यांनी सांगितले. मला धमकी देणाऱ्या आणि समाज माध्यमांवर माझा फोन नंबर शेअर करून अर्वाच्च-अश्लील भाषेचा वापर करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यासाठी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्याकडे या संदर्भात तक्रार करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

'एसआयटी'तही वाल्मिक कराडचे चाहते

संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास करण्यासाठी सीआयडीने स्थापलेल्या एसआयटीवर अंजली दमानिया यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. या एसआयटीमध्ये बीडच्याच अधिकाऱ्यांचा समावेश असून दोन अधिकाऱ्यांचे वाल्मिक कराडशी जवळचे संबंध आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून निष्पक्ष तपास कसा होईल?, त्यामुळे हे पथक तातडीने बरखास्त करावे आणि दुसऱ्या जिल्ह्याबाहेरील किंवा गरज लागली तर दुसऱ्या राज्यातील अधिकाऱ्यांची नेमणूक करावी ,अशी मागणी त्यांनी केली आहे.

# कारवाई दरम्यान तपास यंत्रणा पाहू शकणार नाहीत पर्सनल चॅट

## सरकार नवे नियम आणण्याच्या तयारीत

नवी दिल्ली : केंद्र सरकार तपास यंत्रणांसाठी नवा नियम तयार करत असल्याची माहिती समोर येत आहे. ज्या अतंर्गत सरकारी यंत्रणा कोणत्याही तपासादरम्यान कागदपत्रे अथवा डिजिटल दस्ताऐवज जमा करतात त्यावेळी त्यांनी काय करायचे आणि काय नाही करायचे हे ठरेल. एखाद्या व्यक्तीचे पर्सनल चॅट किंवा तपासाशी निगडीत नसलेली माहिती तपासात समाविष्ट होऊ नये याकरिता हा या नियमांचा उद्देश आहे.

**गोपनियतेचा भंग होऊ नये म्हणून नियम**

हा नियम याकरिता बनवला जात आहे कारण या अगोदर अनेकवेळा असे घडले आहे की, तपास यंत्रणा एखाद्या प्रकरणाच्या तपासादरम्यान अनेक डिजिटल दस्ताऐवजही जप्त करतात. ज्यामध्ये पर्सनल चॅटचाही समावेश होते. त्यामुळे गोपनियतेचा भंग होतो. याकरिताच हा नवा नियम अत्यंत महत्वाचा ठरणार आहे.

**सर्वोच्च न्यायालयाने पर्सनल चॅटसंबंधी आरोपीस दिला होता दिलासा**

सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच लॉटरी किंग सँटियागो मार्टिनच्या फोनमधून सर्व डिजिटल दस्ताऐवज रिकव्हरी करण्यास यंत्रणांना बंदी घातली होती. ईडीने मार्टिन यांच्यावर मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी छापा टाकला. यामध्ये रोख रक्कम १२ कोटी जप्त केली त्यासोबतच त्याचा फोनही जप्त केला होता. यानंतर मार्टिनने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आणि तपास यंत्रणांना डिजिटल दस्ताऐवज जप्त करण्यापासून रोखण्याची मागणी केली. त्याने असा युक्तीवाद केला होता की, त्याच्या फोनमध्ये त्याचे पर्सनल चॅट आहेत ज्याचा त्याच्यावरील मनी लॉन्ड्रिंग प्रकरणाशी काही संबंध नव्हता. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने मार्टिनला दिलासा दिला आणि या खटल्याची सुनावणी मेझॉनने दाखल केलेल्या खटल्यासोबत जोडली आहे. ही सुनावणी ६ जानेवारीला होणार आहे. या प्रकरणा दरम्यानच डिजिटल आणि इतर माहिती कागदपत्रे जप्त करण्यासंबंधी नियमांसंबंधी पावले सरकारकडून उचलण्यात आली आहेत. यासंबंधी तपास यंत्रणांनी ही आपली बाजू स्पष्ट केली आहे. त्याच्या म्हणण्यानुसार आजच्या काळात गुन्हेगार हा गुन्ह्याशी निगडीत कागदपत्रे जतन करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करतात. त्यामुळे तपास करताना डिजिटल कागदपत्रे जप्त करणे आवश्यक आहे.

# नोकरीसाठी मुलाखत द्यायला गेला पण घरी परतलाच नाही; पुण्यातल्या विद्यमान आमदाराचा नातू बेपत्ता

पुणे : पुण्यातून एक खळबळजनक माहिती समोर आली आहे. पुण्यातल्या विद्यमान आमदाराचा नातू बेपत्ता असल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पुण्यातील खासगी रुग्णालयात मुलाखतीसाठी चाललो असल्याचं सांगून घरातून निघालेला आमदार रत्नाकर गुट्टे यांचा नातू दोन तारखेपासून बेपत्ता आहे. रत्नाकर गुट्टे हे गंगाखेड विधानसभा मतदारसंघातून विजयी झाले आहेत. नोकरीसाठी मुलाखत द्यायला चाललो आहे, असे सांगून परळी तालुक्यातील दैठणा घाट या आपल्या मूळ गावावरून निघालेला आमदार रत्नाकर गुट्टे यांच्या सख्ख्या भाचीचा मुलगा पिंपरी-चिंचवड शहरातून बेपत्ता झाला आहे. ही घटना दोन जानेवारीला पिंपळे निलख येथील रक्षक चौकात घडली आहे. सुमीत भागवत गुट्टे (वय २४, रा. दैठाना घाट, ता. परळी, जि. बीड) असे बेपत्ता झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी सुमीत यांच्या आईने सांगवी पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

# मनोज जरांगे पाटलांवर कोसळला दु:खाचा डोंगर

## पुण्यातील मोर्चा अर्धवट सोडून परतले गावी...

पुणे: बीड जिल्ह्यातल्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण केलं, त्यानंतर त्यांची हत्या करण्यात आली, यामुळे आता राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. आरोपींना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी राज्यभरातून होत आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध करण्यासाठी राज्यभरात विविध ठिकाणी मोर्चाचं आयोजन करण्यात आलं आहे. बीड, परभणी नंतर आज पुण्यात आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चाला सर्वपक्षीय नेत्यांसोबतच संतोष देशमुख यांचं कुटुंब देखील उपस्थित होते. या मोर्चासाठी मनोज जरांगे देखील उपस्थित होते, मात्र, मनोज जरांगे पाटील यांना मोर्चातून माघारी आपल्या गावी जावे लागले. त्याचं कारणही समोर आलं आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या चुलत भावाचे अपघाती निधन झाल्याने त्यांना पुण्यातून पुन्हा आपल्या गावी जावं लागलं आहे, चुलत भावाच्या अंत्यविधीला जाण्यासाठी जरांगे पाटील पुण्यातून निघाले असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे जरांगे पाटील हे आजच्या जनआक्रोश मोर्चाच्या मंचावर दिसून आले नाहीत.

दरम्यान सुरेश धस यांनी मोर्चासाठी जमलेल्यांना संबोधित करताना त्याबाबतची माहिती दिली आहे. बोलताना सुरेश धस म्हणाले, आता मनोज दादांच्या कुटुंबातील त्यांचा चुलत भावाचं निधन झालं असल्यामुळे ते इथे येऊन परत गेलेत.साडेपाच वाजता ते त्यांच्या मातोरी या गावावरून निघाले होते इथपर्यंत आले, परंतु दुर्दैवी घटना घडल्यामुळे ते परत गेले आणि पृथ्वीराज देशमुख यांचाही फोन इथे आल्यावर आला होता, की मोर्चाच्या शुभारंभ करून द्यायला मी होतो.




# राज्यात तापमानाचा पारा घसरला

मुंबई: राज्यात पुन्हा एकदा तापमानाचा पारा घसरू लागला आहे. उत्तरेकडचे थंड वारे महाराष्ट्रात येऊ लागल्याने थंडीचा जोर आणखी एकदा वाढू लागला आहे. मराठवाडा तसेच विदर्भातील अनेक ठिकाणी तापमानाच्या पाऱ्यामध्ये १० अंशापेक्षा अधिक घट झाली आहे. येत्या दोन दिवसांत राज्यात थंडीचा कडाका आणखी वाढणार असल्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.पश्चिम चक्रवातामुळे उत्तरेकडील राज्यांमध्ये हलकासा पाऊस तसेच हिमालयालगतच्या भागांमध्ये बर्फवृष्टी होते. त्यामुळे तेथे थंडीचा जोर कमी जास्त होत आहे. शनिवारी मध्य प्रदेशातील मंडला येथे सर्वात कमी ५ अंश सेल्सियसची नोंद झाली. दरम्यान, स्वच्छ सूर्यप्रकाश जमिनीवर येत असल्यामुळे सकाळी थंडी तर दुपारी मात्र उन्हाचे चटके बसत आहेत. राज्यातील धुळे, अहिल्यानगगर, निफाड, जळगाव, पुणे, नागपूर, गोंदिया येथे किमान तापमान १० अंशाच्या खाली घसरले होते. तर अनेक ठिकाणी धुक्यासह दव पडले होते.




